# खास गणेश उत्सवा निमित्त गणेश भक्तांसाठी

## आरती संग्रह

# ऑडियो डिजिटल बुक





## प्रदीप पेशकार

सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार

प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# नमस्कार गणेश भक्तांनो,

गणेशोत्सव म्हणजे महाराष्ट्राची परंपरा आहे.या उत्सवा दरम्यान सर्व घरोघरी गणपती बाप्पाचे विधिवत पूजन करून स्थापना केली जाते. सर्वत्र आनंदाचे वातावरण असते. अश्या या मंगल प्रसंगी उपयोगी असणारी एक छोटीशी खास अनोखी भेट आरती ऑडियो बुक आपल्या हाती देत आहे. यात सर्व देवांच्या आरत्या आपणांस लिखित आणि ऑडियो स्वरुपात मिळतील. आरती ऑडियो स्वरुपात ऐकण्यासाठी, आरती वर क्लिक करावे.

आपणांस ही छोटीशी भेट नक्की आवडेल अशी आशा करतो. व आपणांस सुख,समृद्धी आणि निरोगी आयुष्य लाभो अशी गणपती बाप्पा चरणी प्रार्थना करतो. आपल्या परिवारास गणेश उत्सवा निमित्त हार्दिक शुभेच्छा.

कळावे आपला,

टिप :- ऑडिओ आरती ऐकण्यासाठी दिलेल्या बटनावर क्लिक करा.




**प्रदीप पेशकार**

सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार

प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र


Click to follow us

## ।। श्री गणेशाय नमः ।।

## सुखकर्ता दुखहर्ता

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पूर्वी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळाची ।। १ ।।

जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ।।
रत्नखचित फरा तूज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।
हिरे जडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नुपुरे चरणी घागरिया ।। 2 ।।

लंबोदर पितांबर फनी वरवंदना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवंदना ।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ।। ३ ।।

आरती ऐकण्यासाठी येथे क्लिक करा



**प्रदीप पेशकार**
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# शेंदूर लाल चढायो अच्छा गजमुखको

शेंदूर लाल चढायो अच्छा गजमुखको,
दोंदिल लाल बिराजे सूत गौरीहरको ,
हाथ लिए गुड-लड्डू साईं सुरवरको ,
महिमा कहे ना जाय लागत हूँ पदको,

जय जय श्री गणराज विध्यासुखदाता,
धन्य तुम्हारा दर्शन मेरा मन रमता,

अष्टो सिद्धि दासी संकटको बैरी,
विघनाविनाशन मंगल मूरत अधिकारी,
कोटि सूरजप्रकाश ऐसी छबि तेरी,
गंड-स्थल मदमस्तक झूले शाशिहारी,

आरती
ऐकण्यासाठी
येथे
क्लिक करा

जय जय श्री गणराज विध्यासुखदाता,
धन्य तुम्हारा दर्शन मेरा मन रमता,

भावभगत से कोई शरणागत आवे,
संतति सम्पति सभी भरपूर पावे,
ऐसे तुम महाराज मोको अति भावे,
गोसावीनंदन निशिदिन गुण गावे,

जय जय श्री गणराज विध्यासुखदाता,
धन्य तुम्हारा दर्शन मेरा मन रमता.




**प्रदीप पेशकार**
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# देवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी।
अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी।
वारी वारी जन्म मरणांते वारी।
हारी पडलो आता संकट निवारी॥१॥

जय देवी जय देवी महिषा सुरमथिनी।
सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी॥धृ॥

आरती ऐकण्यासाठी येथे क्लिक करा

तुजवीण भुवनी पाहता तुज ऐसे नाही।
चारी श्रमले परंतु न बोलवे काही।
साही विवाद करिता पडले प्रवाही।
ते तू भक्तालागी पावसी लवलाही॥२॥

प्रसन्न वदने प्रसन्न होती निजदासा।
क्लेशांपासूनी सोडवी तोडी भवपाशा।
अंबे तुजवाचून कोण पुरवील आशा।
नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा॥३॥



प्रदीप पेशकार
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# श्री महालक्ष्मीची आरती

जय देवी जय देवी जय महालक्ष्मी
वससी व्यापकरूपे राहे निश्चलरूपे तू स्थूलसुक्ष्मी. जय.

करवीरपूर वासिनी सुरवर मुनिमाता
पुरहर वरदायिनी मुरहर प्रियकांता
कमलाकारे जठरी जन्मविला धाता
सहस्त्र वदनी भूधर नपुरे गुणगाता. जय.

मातुल्लिंग गदा खेटक रविकिरणी
झळके हाटकवाटी पीयुष रसपाणि
माणिक रसना सुरंग वसना मृगनयनी
शशीकर वदना राजस मदनाची जननी. जय.

आरती
ऐकण्यासाठी
येथे
क्लिक करा

तारा शक्ती अगम्या शीवभजका गौरी
सांख्य म्हणती प्रकृती निर्गुण निर्धारी
गायत्री नीजबीजा निगमागमसारी
प्रगटे पद्मावती निजधर्माचारी. जय.

अमृत भरिते सरिते अघदुरिते वारी
मारी दुर्घट असुरा भवदुस्तर तारी
वारी माया पटल प्रणमत परिवारी
हे रूप चिद्रूप दावी निर्धारी. जय.

चतुराननाने कुश्चित कर्मांच्या ओळी
लिहिल्या असतिल माते माझे निजभाळी
पुसोनि चरणातळी पदसुमने क्षाळी
मुक्तेश्वर नागर क्षीरसागर बाळी. जय.



**प्रदीप पेशकार**
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# श्री दत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।।
नेती नेती शब्द न ये अनुमाना । सुरवर मुनिजन योगी समाधी न ये ध्याना ।।१।।

जय देव जयदेव जय श्री गुरुदत्ता। आरती ओवाळिता हरली भवचिंता। जय देव जय देव।

सबाह्य अभ्यंतरीं तू एक दत्त। अभाग्यासी कैंची कळेल ही मात ।।
परा ही परतली तेथे कैंचा हा हेत । जन्मरमरण्याचा पुरलासे अंत ।।२।। जय देव जय देव

आरती ऐकण्यासाठी येथे क्लिक करा

दत्त येऊनिया उभा ठाकला । सद्भावे साष्टांग प्रणिपात केला ।।
प्रसन्न होऊनिया आशीर्वाद दिधला । जन्ममरण्याचा फेरा चुकविला ।।३।। जय देव जय देव

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान। हारपले मन झाले उन्मन।।
मीतूंपणाची झाली बोळवण । एका जनार्दनीं श्री दत्त ध्यान ।।४।।
जय देव जय देव



**प्रदीप पेशकार**

सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार

प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# श्री शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा।
वीषें कंठी काळा त्रिनेत्रीं ज्वाळां।।
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा।
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।।1।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा।।
आरती ओवाळूं तुज कर्पुगौरा ।।ध्रु.।।

कर्पुगौरा भोळा नयनीं विशाळा।
आर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा।
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।। जय. ।।2।।

आरती
ऐकण्यासाठी
येथे
क्लिक करा

देवी दैत्यीं सागरमंथन पैं केलें।
त्यामाजी जें अवचित हळाहळ उठिलें।
तें त्वां असुरपषं प्राशन केलें।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें।। जय. ।।3।।

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी।
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी।
रघुकुलतिलक रामदासा अंतरी।।
जय देव जय देव जय श्रीशंकरा।।4।।



**प्रदीप पेशकार**
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# श्री साईबाबाची आरती

आरती साईबाबा । सौख्यदातार जीवा।
चरणरजातली । द्यावा दासा विसावा, भक्ता विसावा ।। आ०।।ध्रु०।।
जाळुनियां अनंग। स्वस्वरूपी राहेदंग ।
मुमुक्षूजनां दावी । निज डोळा श्रीरंग ।। आ०।। १ ।।
जयामनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।
दाविसी दयाघना । ऐसी तुझीही माव ।। आ०।। २ ।।
तुमचे नाम ध्याता । हरे संस्कृती व्यथा ।
अगाध तव करणी । मार्ग दाविसी अनाथा ।। आ०।। ३ ।।
कलियुगी अवतार । सगुण परब्रह्मः साचार ।
अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ।। द०।। आ०।। ४ ।।

आरती ऐकण्यासाठी येथे क्लिक करा

आठा दिवसा गुरुवारी । भक्त करिती वारी ।
प्रभुपद पहावया । भवभय निवारी ।। आ०।। ५ ।।
माझा निजद्रव्यठेवा । तव चरणरज सेवा ।
मागणे हेचि आता । तुम्हा देवाधिदेवा ।। आ०।। ६ ।।
इच्छित दिन चातक। निर्मल तोय निजसुख ।
पाजावे माधवा या । सांभाळ आपुली भाक ।। आ०।। ७ ।।




प्रदीप पेशकार
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# मंत्रपुष्पांजली

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तनि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमान : सचंत यत्र पूर्वे साध्या : संति देवा : ।।
राजाधिराजाय प्रसह्य साहिने ।
नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स मस कामान् काम कामाय मह्यं।
कामेश्र्वरो वैश्रवणो ददातु कुबेराय वैश्रवणाय ।
महाराजाय नमः ।
स्वस्ति। साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं
वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं
समंतपर्यायीस्यात् सार्वभैमः सार्वायुष आं
तादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकेराळिति
तदप्येषः श्लोको भिगीतो मरुतः परिवेष्टारो
मरुतस्यावसन् गृहे ।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्र्वेदेवाः सभासद इति ।।

एकदंतायविघ्महे वक्रतुण्डाय धीमहि ।
तन्नोदंती प्रचोदयात् ।

मंत्रपुष्पांजली समर्पयामि ।।

।। गणपती बाप्पा मोरया ।।

आरती
ऐकण्यासाठी
येथे
क्लिक करा



**प्रदीप पेशकार**
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

## घालिन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।
भावे ओवाळिन म्हणे नामा ।।

त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बंधू सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ।।

आरती
ऐकण्यासाठी
येथे
क्लिक करा

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेती समर्पयामि ।।

अच्युतं केशवं राम नारायणम्
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम्
जानकीनायकं रामचंद्र भजे ।।

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।
।। गणपती बाप्पा मोरया ।।



प्रदीप पेशकार
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्ष:भाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र

# गणपती स्तोत्र ( संकटनाशन स्तोत्र )

प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम्
भक्तावासं स्मरेनित्यम आयुष्कामार्थ सिध्दये ॥१॥

प्रथमं वक्रतुण्डं च एकदन्तं द्वितीयकम्
तृतीयं कृष्णपिङ्गाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम ॥२॥

लम्बोदरं पञ्चमं च षष्ठं विकटमेव च
सप्तमं विघ्नराजेन्द्रं धुम्रवर्णं तथाषष्टम ॥३॥

नवमं भालचंद्रं च दशमं तु विनायकम्
एकादशं गणपतिं द्वादशं तु गजाननम ॥४॥

आरती
ऐकण्यासाठी
येथे
क्लिक करा

द्वादशेतानि नामानि त्रिसंध्यं यः पठेन्नरः
न च विघ्नभयं तस्य सर्वसिध्दीकर प्रभो ॥५॥

विद्यार्थी लभते विद्यां धनार्थी लभते धनम्
पुत्रार्थी लभते पुत्रान्मोक्षार्थी लभते गतिम ॥६॥

जपेद्गणपतिस्तोत्रं षडभिर्मासे फलं लभेत्
संवत्सरेण सिध्दीं च लभते नात्र संशयः ॥७॥

अष्टभ्यो ब्राह्मणेभ्यश्च लिखित्वा यः समर्पयेत
तस्य विद्या भवेत्सर्वा गणेशस्य प्रसादतः ॥८॥

इति श्रीनारदपुराणे संकटनाशनं नाम श्रीगणपती स्तोत्रं संपूर्णम ॥




**प्रदीप पेशकार**
सदस्य : नॅशनल बोर्ड फॉर एमएसएमई ,भारत सरकार
प्रदेश अध्यक्षःभाजपा उद्योग आघाडी ,महाराष्ट्र